MHAK100012792022

Cri.M.A./298/2022

**Baburao Govinda Bhokare Vs. Secretary, Gram Panchayat, Gondhalwadi**

## निशाणी क्रमांक १ खाली आदेश

(पारीत दिनांक १६.०६.२०२२)

१)    अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद होण्याच्या आदेशाकरिता दाखल केला आहे.

२)    अर्जदाराच्या कथनानुसार त्यांचा मुलगा नामे कृष्णा बापूराव भोकरे याचा जन्म दिनांक १५.०८.२०१७ रोजी गोंधळवाडी, ता.पातुर, जि.अकोला येथे झाला. अर्जदाराला जन्म नोंदणीसंबंधी पूरेशी माहिति नसल्यामुळे तसेच अनावधानाने त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयात करण्यात आली नाही. अर्जदाराला त्यांच्या मुलाच्या शासकीय व वैयक्तीक कामाकरिता जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

३)    अर्जदाराने केलेला अर्ज, परिस्थिती, समोर आलेला पुरावा तसेच अर्जदाराच्या वतीने करण्यात आलेला युक्तिवाद यांचा विचार करता या प्रकरणात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होत असून त्यावर सविस्तर कारणमिमांसा देवून मी खालीलप्रमाणे माझा निष्कर्ष आणि निवाडा दिला आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. अर्जदार हे सिध्द करतो का की, त्यांचा मुलगा नामे कृष्णा बापूराव भोकरे याचा जन्म दिनांक १५.०८.२०१७ रोजी झाला? | ... | होय. |
| २. आदेश काय ? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

### कारणमिमांसा

<u>मुद्दा क्रमांक १ व २ करिता</u> :

४)	अर्जदाराने त्यांच्या अर्जाच्या पृष्ठयर्थी त्यांची साक्ष नि.क्र.०७ वर नोंदविली. अर्जदाराने सचिव, ग्रामपंचायत, गोंधळवाडी यांनी दिलेले जन्माची नोंद नसल्याबाबत जन्म–मृत्यु नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र नि.क्र.०८ दाखल केले. अर्जदाराचा शपथेवरील पुरावा, अंगणवाडी सेविका, गोंधळवाडी यांनी दिलेले प्रमाणपपत्र नि.क्र.१० व पोलीस पाटील गोंधळवाडी यांनी दिलेले ओळखपत्र नि. क्र.११ यांवरुन असे दिसुन येते की, अर्जदाराचा मुलगा नामे कृष्णा बापूराव भोकरे याचा जन्म दिनांक १५.०८.२०१७ रोजी झाला.

५)	अर्जदाराने सदर अर्जाबाबत दिनांक २१.०१.२०२३ ला प्रकाशीत दैनिक 'दर्शन' वृत्तपत्रामध्ये जाहिर नोटिस नि.क्र.१२ प्रसिध्द केली होती. परंतु अर्जदाराच्या अर्जास कोणीही आक्षेप केलेला नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज न्यायाचे दृष्टीने मंजुर करणे योग्य राहील. म्हणुन मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देतो व मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरात खालील आदेश पारीत करीत आहे :–

## <u>आ दे श</u>

१)	अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२)	सचिव, ग्रामपंचायत, गोंधळवाडी, ता.पातुर, जि.अकोला यांना आदेशीत करण्यात येते की, कलम १३(३) अन्वये जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये त्यांनी कृष्णा बापूराव भोकरे याचा जन्म दिनांक १५.०८.२०१७ रोजी झाला अशी नोंद त्यांच्याकडील जन्म–मृत्यु नोंदणी अभिलेखात घ्यावी.

३)	अर्जदाराने सदर नोंद जन्म–मृत्यु अभिलेखात नोंदणी करण्यास नियमानुसार शुल्क दयावे.

PRASAD SAHEBRAO THAKARE
Digitally signed by PRASAD SAHEBRAO THAKARE
Date: 2023.06.16 17:29:14 +0530

(प्रसाद एस. ठाकरे)

दिनांक:१६.०६.२०२३.		न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पातुर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word to word as per original .

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : R. P. Khandare |
| Court Name | : Prasad S. Thakare, Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Patur |
| Date | : 16.06.2023 |
| Signed by presiding officer on | : 16.06.2023 |
| Uploaded on | : 17.06.2023 |